MHWS080013772025

**<u>रे. मु. नं.९७/२०२५ मधील नि.क्र. १४ वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला लेखी जबाब नाहीचा आदेश रदद होउन लेखी जबाब दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दिलेला आहे.

**०२.** अर्जातील प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांचे कथनानुसार, दावा प्रतिवादीच्या लेखी जबाबाकरीता नेमला असून काही महत्वाची माहिती व कागदपत्रे उपलब्ध नसल्याने मागील तारखेवर लेखी जबाब दाखल करु शकले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरुध्द विनाजबाब चौकशीचा आदेश पारित झालेला आहे. सदरचा आदेश रदद होउन प्रतिवादीं यांना लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

**०३.** सदर अर्जावर वादीचे लेखी म्हणणे मागविण्यात आले. वादीचे म्हणण्यानुसार, प्रतिवादी दिनांक ०९.०८.२०२५ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. मात्र त्यांनी जाणीवपूर्वक विलंब केलेला आहे. त्यामुळे अर्ज खारीज करावा अथवा मंजूर करण्याचे झाल्यास र.रु.१०००इतका दंड आकारावा अशी विनंती केली.

**०४.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा जाहीर ठराव व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना दिनांक ०९.०८.२०२५ रोजी नोटीस बजावणी होउन देखील त्यांनी मुदतीत कैफियत दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द दिनांक २१.११.२०२५ रोजी विनाजबाब चौकशीचा आदेश

पारीत झाल्याचे दिसून येते. त्यानंतर सुमारे २ महिन्याचे विलंबाने प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केला असून अर्जात नमूद कारणे कागदोपत्री पुराव्या अभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींना बचावाची संधी देणे नैसर्गीक न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. त्यामुळे झालेल्या विलंबाबाबत ठराविक दंड आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१ प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांचा प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.१४ मंजूर करण्यात येतो.

२ प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी लेखी जबाब सादर करण्यास झालेला विलंब त्यांनी प्रत्येकी रक्कम रू. २००/— चा दंड वादींना देण्याच्या अटीवर माफ करणेत येतो. प्रतिवादी यांनी दिलेला लेखी जबाब, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी सामील करुन घेण्यात येईल.

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.01.22 17:35:08 +0530

(पी. व्ही. सपकाळ)

दिनांक — २२.०१.२०२६

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर रिसोड

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग<br>न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच.ए. उचाडे |
| निकाल तारीख | : | २२.०१.२०२६ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | २२.०१.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | २२.०१.२०२६ |